# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०३/२०२५ (रविवार) दुपार**

---

## सोशल मिडीयवर धार्मीक भावना दुखावतील अशा पोस्ट टाकुन जातीय तेढ निर्माण करणाऱ्या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दल हे सतत सोशल मिडीया मॉनिटरींग करत असुन सोशल मिडीयावर बारकाईने लक्ष ठेवुन आहे. त्यामुळे कोणीही कोणत्याही जाती ,धर्माला अनुसरून धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीय तेढ निर्माण होतील असे फोटो,व्हिडीओ किंवा मजकुर सोशल मिडीयावर पोस्ट करत असेल ,शेयर करत असेल किंवा स्टोरी /स्टेटस ठेवत असेल तर त्यांच्यावर तात्काळ कायदेशिर कारवाई केली जात आहे.त्यानुसार आज रोजी खालील प्रमाणे २ गुन्हे नोंद आहे.**

१.पोलीस स्टेशन पारशिवणी :— .आरोपी नामे रविंद्र सदाशिवराव बर्वे , वय ४९ वर्षे, रा पारशिवणी, जि. नागपुर याने त्याचे फेसबुक अकाउंट वरून हिंदु समाजातील धर्म प्रथांबाबत विवादास्पद पोस्ट टाकुन धार्मीक भावना दुखावतील तसेच जातीय तेढ निर्माण होईल असे कृत्य केल्याने पोलीस स्टेशन पारशिवणी येथे नमुद आरोपीतांविरूध्द कलम १९६,३५३ (२),६१(२) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

२.पोलीस स्टेशन काटोल :— .आरोपी नामे हर्षल गणेश ऑस्करकर ,रा. पेठ बुधवार, काटोल, जि. नागपुर याने त्याचे इन्स्टाग्राम अकाउंट वर औरंगजेब बाबत विवादास्पद फोटो ` स्टोरी /स्टेटस ठेवल्याने पोलीस स्टेशन काटोल येथे नमुद आरोपीतांविरूध्द कलम २९९, १९६,३५३ (२), भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.दोन्ही आरोपीतांचे मोबाईल जप्त करण्यात आले असुन दोन्ही आरोपीतांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**